# असंघटीत महिला कामगारांचे प्रश्न

**प्रा. डॉ. सुरेश एम. डोहणे**
*समाजशास्त्र विभागप्रमुख,*
*राजे विश्वेश्वरराव महाविद्यालय,*
*भामरागड, जिल्हा गडचिरोली.*

ज्याला धन नाही, त्याला मन नाही. कारण त्याला अर्थार्जनासाठी दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. त्याला आपले स्वतंत्र विचार, स्वतंत्र मन जोपासता येत नाही. स्वाभिमानाने जगता येत नाही. त्याला दैनंदिन व्यवहारात जीवंत राहण्यासाठी अनेक तडजोडी कराव्या व स्विकाराव्या लागतात. स्वत:च्या विचाराविरुद्ध व मनाचे स्वातंत्र्य गमावून व्यवहार करावे लागतात. अशी श्रमिकांची व्यथा आणि कथाही आहे.

देशात विषमतावादी समाजरचना, अत्याधिक लोकसंख्या आणि मुलभूत साधणांची कमतरता यामुळे देशात मोठ्या प्रमाणात गरिबी आहे. प्रत्येक व्यक्तीला जीवंत राहण्यासाठी उत्पन्न मिळवावे लागते आणि उत्पन्न मिळविण्याकरीता रोजगार मिळवावा लागतो. साधणांची कमतरता आणि रोजगाराचा अभाव यामुळे गरिबांपुढे उदर भरणाचा प्रश्न नेहमीच निर्माण होतो. त्यांचे पोट हातावर असते. म्हणजे रोज मजूरी करून पैसे आणल्याशिवाय खायला मिळत नाही. असे असले तरी रोज मजूरी मिळेलच याची काहीच शाश्वती नसते. त्यामुळे काही लोकं समाज विसंगत मार्ग पत्करतात. तर काही लोकं थोडफार उत्पन्न देणारी लहानसहान समाजसंगत कामे पत्करतात. विशेषत: महिला घराघरातील 'कपडे, भांडे धुण्याचा' रोजगार पत्करून गरिबीच्या गर्तेतून कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याची कसरत करित असतात. गरिबी ही शेतकरी व कामगारांची व्यवहारिक समज वाढवित असली तरी जीवनाचा आनंद हिरावून अकाली प्रौढत्व व वार्धक्य बहाल करणारी बला आहे. गरिबी सर्वार्थाने वाईटच असते. तिचे गुणगान करता येत नाही.

कामगार विशिष्ट कालावधीसाठी आपले श्रम विकून अर्थार्जन करीत असतात. कामगार विविध क्षेत्रात विखुरलेले असतात. आपली ईच्छा, क्षमता आणि कौशल्य लक्षात घेऊन कामगार स्वत:साठी काम मिळवितात. कामगार काही क्षेत्रात संख्या, संपर्क आणि संघटनेच्या माध्यमातून संघटीत असतात. तर काही क्षेत्रात अपूरी संख्या व संपर्काअभावी असंघटीत असतात. संघटीत क्षेत्रात कामगारांची सौदाशक्ती, मजुरी, सहकार्य, कामाचे ठिकाण आणि संरक्षण याबाबतीत स्थिती चांगली असते. याउलट असंघटीत कामगारांच्या बाबतीत स्थिती वाईटच असते. शहरातील लहानमोठ्या उद्योगात काम करणारे कामगार संघटीत असतात. तर विविध दुकानातील नोकर, बांधकामावरील मजुर, ट्रक-टॅक्टरवरील मजूर, घराघरातील कपडे, भांडेधूनी करणाऱ्या महिला इत्यादी हे असंघटीत कामगार होत. कामाच्या ठिकाणची यांची अल्पसंख्या, परस्पर संपर्काचा अभाव, नेतृत्वाची कमतरता, संघटनेचा अभाव, मालकांचा धाक, रोजगार बुडण्याची भिती इत्यादी कारणामुळे हे कामगार असंघटीत असल्याने दिसून येते. हा शोधालेख मुख्यत्वे कपडे, फरशी, भांडेधूनी करणाऱ्या असंघटीत महिलांवर (कामवाली बाई) आधारीत आहे. या शोधालेखात उद्देशपूर्ण निरिक्षणातून त्यांच्या समस्यांचा शोध घेण्यात आला आहे.

'स्वयंपाक करणे (स्वयंपाकीन), फरशी, कपडे, भांडेधुनी करणे' हा रोजगार शहरी विभागात निर्माण होतो. श्रिमंत, मध्यमवर्गीय महिलांची परिश्रम करण्याची वृत्ती नसते किंवा कमी असते. तसेच शहरात अडचणीच्या वेळी इतरांचे सहकार्य लाभेलच याची शाश्वती नसते. याउलट ग्रामिण भागातील लोकं परिश्रमी वृत्तीचे असतात. तसेच ते अडचणीत एक – दुसऱ्याला सहकार्य करणारे असतात. त्यामुळे ग्रामिण भागात हा रोजगार निर्माण होत नाही. साधारणपणे शहरातील पुढील कुटुंबांमध्ये हा रोजगार निर्माण होतो. 1) आर्थिकदृष्ट्या सधन कुटुंबे, 2) अधिकारी- कर्मचाऱ्यांचे कुटुंब, 3) महिला नसलेले कुटुंब, 4) दिर्घकाळ आजारी, अपंग महिलांचे कुटुंब, 5) पती-पत्नी नोकरीत असलेले कुटुंब, 6) आळशी महिलांचे कुटुंब, 7) उच्चशिक्षित महिलांचे कुटुंब, 8) व्यवसायिक महिलांचे कुटुंब, 9) प्रदर्शन प्रभावातील महिलांचे कुटुंब या कुटुंबामध्ये हा रोजगार निर्माण होतो.

हा रोजगार स्विकारणारे कामगार बहुतांश महिलांच असतात. या रोजगारात पुरुष अपवादात्मक आहेत. साधारणपणे पुढील कुटुंबातील महिला हा रोजगार करतात.

1) गरिब महिला, 2) विधवा, 3) दिर्घआजारी पतीची पत्नी, 4) व्यसनाधिन पतीची पत्नी, 5) आळशी नवऱ्याची पत्नी, 6) नवऱ्याला सहाय्य करणारी पत्नी, 7) शिकणाऱ्या मुली अशा महिला मुलांच्या, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरीता हा रोजगार स्विकारतात. या महिला अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असतात. सामाजिकदृष्ट्या या एस.सी., एस.टी., ओबिसी, एन.टी. या प्रवर्गातील आहेत. ब्राम्हण, क्षत्रिय, बनिया, मारवाडी या जातीतील तसेच मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, जैन या धर्माच्या महिला या व्यवसायात आढळून येत नाहीत.

ही कामवाली बाई शहरात विशिष्ट परिसरातील 8-10 घरातील कामे मिळविते. काही घरी ती, भांडेधूनी करते, काही घरी कपडेधूनी करते, काही घरी कपडे व भांडेधूरी करते, तर काही घरी फरशी, कपडे, भांडेधूनी करते. आजघडीला ती एका कामाचे महिन्याचे 700 ते 800 रुपये घेते. प्रत्येक घरी जाण्याची व कामाची वेळ ती आपल्या सोयीनुसार ठरविते व सुट्ट्याही आपल्या सोयीनुसारच घेते. कधी एक-दोन दिवस तर कधी चार पाच दिवस कधी पूर्वसुचना देते तर कधी पुर्वसुचना देत नाही. मालकीनीचा फोन आला तरी अनेकदा फोन उचलत नाही किंवा उचललाच तर थातुरमातून कारण सांगून मोकळी होते. या कामवाल्या बाईने ज्या घरातील कामे स्विकारलेली असतात त्या घरच्या महिलेलाच कामवाली बाई काही कामे करून ठेवण्यास सांगते. जसे – निरम्याच्या पाण्यात कपडे भिजवून ठेवणे, कपड्यांना साबुन लावून ठेवणे, भांड्यांचा खरकटा काढून, घासून ठेवणे, भांड्यांवर पाणी टाकून ठेवणे, अधिक भांडे किंवा कपडे न काढणे इत्यादी. कामवाली बाई मग दहा पंधरा मिनिटातच दोन टोपले भांडे धुऊन मोकळी होते. किंवा दहा मिनिटात बकेटभर कपडे धुऊन मोकळी होते. यामुळे त्यांची कामे किती दर्जेदार असतील याची कल्पना करवत नाही. आणि वस्तुस्थिती पहावत नाही. असे असतांना मालकीन कामाबाबत, सुट्ट्यांबाबत, पैसे कपातीबाबत काही बोलली तर उद्धटपणे उलटून बोलून, तंबी देऊन कामवाली बाई तिला निरुत्तर करते. हे ही वास्तव आहे की, कामवाली बाई दुपारपर्यंत न आल्यास किंवा यावयास उशिर झाल्यास घरवालीची धडधड वाढू लागते. ती अस्वस्थ व्हायला लागते.

कामवाल्या बाईने 8-10 घरातील कामे धरलेली असतात. त्यामुळे ती सकाळी लवकर उठून आणि लगबगीने घरातील कामे कशीबशी उरकून कामाकडे निघते. घरातील सर्वच कामे ती रोज उरकून कामावर जाऊ शकत नाही. घरातील बरीच कामे तशिच पडून असतात. घरात लहान मोठी मुलगी मुलगा किंवा वडिलधारी असल्यास तिच्या मागे काही कामे सावरली जातात. ती कामावर गेल्यावर कधी एखाद्या घरी चहा मिळतो तर एखाद्या घरी नाश्ता मिळतो. कधी मिळतो तर कधी मिळत नाही. कामं करता करता थकवा आला की, मग एखाद्या घरी चहा किंवा नाश्ता स्वतःच मागून घेते. 8-10 घरातील कामे करुन घरी जायला तिला 2-3 वाजतात. तोपर्यंत मुलाबाळाकडे, घराकडे दुर्लक्ष. घरी गेल्यावर स्वतःची आंघोळ, जेवण आणि घरातील कामे लागून असतात. नवरा दारुडा असल्यास त्याची किटकीट, भांडण, मारझोड चालु असते. 6-7 घरी काम करून आल्यावर घरातील या परिस्थितीला तिला सामोरं जावं लागतं. तिचं वात्सल्य आटलं नसल तरी मुलांचा लाड करण्यास पुरेशी वेळ आणि कुटुंबातील वातावरण उपलब्ध नसते. कुटुंबाच्या अडिअडचणींचा विचार करता करता तिच मन विषन्न होऊन जाते. मुलांची शाळा, अभ्यास, सोबती, सवयी याकडे ती लक्ष देत नाही. तिच्या स्वतःच्या सवयी आणि आरोग्यविषयक बाबी वाट बघत असतात. अडचणी तिच्या सोबत चालत असतात आणि अपेक्षा कोमात गेल्या असतात.

काही घरातील महिला –पुरुष सहव्हृदयी असतात. ते कामवाल्या बाईसोबत सन्मानाने व्यवहार करतात. चहा, नाश्ता व कधी जेवणही देतात. महिना भरताच तिचे मानधन नियमीत देतात. अडचणींच्या प्रसंगी आगावू उधार पैसेही देतात. एक-दोन सुट्ट्यांकडे दुर्लक्ष करतात. पण सर्वच घरातील लोकं सारखेच नसतात. काही घरातील महिला व पुरुष उद्धट असतात. लहानसहान बाबीवर कामवालीचा पाणउतारा करतात. एकेरी बोलतात. अपमानीत करतात. सुट्ट्यांचे पैसे कापतात. कामावरून बंद करण्याची धमकी देतात. तसेच काही घरातील पुरुष किंवा तरुण मुलं कामवालीवर वाईट नजर ठेवतात. कधीकधी घरची महिला नसतांना कामवाली सोबत छेडछाड करतात. तसेच पैशाचे प्रलोभन देऊन कामवालीचे लैंगिक शोषणही करतात. अशाप्रकारे कामाच्या घरातील परिस्थितीचा कामवाल्यां बाईला आपल्या कुवतीनुसार सामना करावा लागतो.

**कामवाल्या बाईचे (महिलांचे ) प्रश्न :-**

शहरी जीवनातील घरांमध्ये उपलब्ध होणारा हा रोजगार, काम सुसह्य आणि सहजसोपा असेल असे प्रथमदर्शनी वाटण्याचा संभव आहे. पण तसे नाही. कामवाल्या बाईचा स्वभाव, तिच्या कामाचा दर्जा आणि त्या घरातील महिला

यावर बरेच काही अवलंबून असते. त्याचप्रमाणे कामवाल्या बाईच्या अडचणी किंवा प्रश्न तिचे शिक्षण, स्वभाव, कामाची वृत्ती, नवरा, कुटुंबातील वातावरण संपर्कातील व्यक्ती अशा बऱ्याच बाबींवर अवलंबून असतात. असे असले तरी कामवाल्या बाईला साधारणपणे पुढील प्रश्नांचा सामना करावा लागतो.

**१. गरिबी :-**

कामवाल्या बाईचे कुटुंब गरिब असते. म्हणूनच ती कामासाठी बाहेर पडलेली असते. 'उन्हातान्हातील कामापेक्षा सावलीतील काम बरे' म्हणून तिने घरादारातील कपडे भांडेधुन्याचे काम स्विकारलेले असते. काहींच्या कुटुंबात कमविणारा असतो तर काही कुटुंबात नसतो. मिळणारे उत्पन्न अगदिच अपुरे असल्याने कुटुंबातील सदस्यांच्या प्राथमिक गरजाही पूर्ण करतांना फार ओढतान होते. मन कासाविस होते. गरजांच्या अपूर्णतेमुळे मनाचा तिळपातळ होतो. उपभोग न्युनतेमुळे शरिर, बुद्धी, स्वभाव, आणि भाषेतही न्युनता येते आणि मर्यादांचे भान व सहनशिलता संपूण गेली असते.

**२. व्यसनाधिन / आळशी नवरा :-**

पुरुषाने रोजगार मिळवून कुटुंबाचे भरणपोषण करावे असे अपेक्षित असते. नव्हे ती त्याची जबाबदारीच असते. पण, काही पुरुष व्यसनांच्या आहारी गेल्यामुळे आळशी बनतात. तर काहीक पुरुष व्यवसनाधिन नसले तरी ते मुळातच आळशी असतात. त्यांना कोणत्याच कामाची ईच्छा आणि उत्साह नसतो. असे व्यसनाधिन, आळशी नवरे आपल्या पत्नीच्या सुख समाधानाची पुरती वाट लाऊन टाकतात. मुलांचे भविष्य पिऊन टाकतात. कुटुंबाला उद्धस्त करून टाकतात. त्यामुळे कुटुंबाच्या उदरभरणाची जबाबदारी बायकांवर येऊन तिने हा रोजगार स्विकारलेला असतो आणि नवरे बायकांच्या श्रमावर जगतात.

**३. मनस्ताप :-**

कपडे, भांडे धुन्याचा रोजगार फार सन्माननिय नसतो. तसेच तो स्थिरही नसतो. तरिही कुटुंबात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे तिने हा रोजगार स्विकारलेला असतो. घरची आवराआवर करतांना तारांबळ उडते. मुलांकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. वेगवेगळ्या घरच्या कामाची स्थिती वेगवेगळी असते. शरिर आणि मन आधिच अस्वस्थ असते. अशा स्थितीत कामावरून आल्यावर दारुड्या नवऱ्याच्या किंवा कुटुंबातील अन्य सदस्यांच्या भानगडी असतात. त्यामुळे कामवाल्या बाईला नेहमीच मनस्ताप सहन करावा लागतो.

**४. मुलांची आबाळ :-**

सकाळी लवकर उठून घाईघाईत घरची कामे उरकून लगबगीने ती कामावर निघून जाते. घरी लहान किंवा किशोरवयीन मुले –मुली असतात. मुलांकडे शेजाऱ्यांना लक्ष द्यायला सांगून ती कामावर गेली असते. मुलांची आंघोळ, जेवण, शाळा, अभ्यास, खेळ, प्रेम या मुलांच्या गरजा असतात. पण त्या पूर्ण होत नाहीत. आईच्या मागे ती मुले लहानसहान कामे करून जबाबदार बनायला लागतात. किंवा उनाड व्हायला लागतात. ती शाळेत जातील अभ्यास करीतलच याची शाश्वती नसते. ती कामावरून आल्यावर थकल्यामुळे ईच्छा असूनही जवळ घेऊन लाड करीत नाही. अभ्यास घेऊ शकत नाही. तशी ती स्वतःही फार शिकलेली नसते.

**५. घरची गैरसोय :-**

सकाळी लवकर तीला कामावर जावे लागत असल्यामुळे घरचा स्वयंपाक, पाणी भरणे, कपडे धुणे, झाडलोट करणे, सडा समार्जन, घरातील सामानाची व्यवस्था ही घरची दैनंदीन कामे पूर्ण होण्याची शक्यता कमीच असते. मुले किंवा मुली मोठे असल्यास थोडी मदत मिळते. अन्यथा घरची गैरसोयच होते.

**६. स्वतःकडे दुर्लक्ष :-**

घरची गरिबी, निकामी दारुडा नवरा, लहान मुले, घरातील कामाची कसरत, कुटुंबातील वातावरण या सर्व बाबी सावरता तिला स्वतःकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. तिची स्वतःच्या जेवणाची, आंघोळीची, स्वच्छतेची बरीच आबाळ होते. थकव्याकडे दुर्लक्ष होते. लहानसहान दुखण्याकडे दुर्लक्ष करण्याची तिला तर सवयच झाली असते.

**७. कुपोषन :-**

कामावरील एखाद्या घरी चहा किंवा नाश्ता किंवा शिळे अन्न मिळाले की त्यावरच दिवस निघतो. दररोजच चहा, नाश्ता किंवा शिळे अन्न मिळेलच असेही नाही. कामावरून घरी येता दुसरी प्रहर उलटून गेली असते. जेवणाची वेळ टळून गेली असते. तसेच गरिबीमुळे पुरेसे अन्न मिळत नाही. पौष्टिक अन्नाचा तर विचारच होत नाही. त्यामुळे महिला आणि मुलांचे कुपोषन होते.

**८. स्वतःचे व्यसन :-**

कामवाल्या बायांना बहुधा खर्रा, तंबाखू, गुटखा, पानसुपारी यांचे व्यसन लागले असते. त्यांचे शरिर आधिच किरकोड व कुपोषीत असते. अशा कमजोर शरिरावर व्यसनांचा विपरीत परिणाम होऊन त्या अनेकदा विविध आजारांना

बळी पडतात. त्यामुळे त्यांचे पैसेही वाया जातात आणि असह्य वेदनाही सोसाव्या लागतात.

**९. काम जाण्याची भिती :-**

रोजची कामाची दगदग यामुळे शरिर व मनाला थकवा येतो. कामाचा कंटाळा येतो. या कंटाळ्यामुळे, नातेवाईकाकडील लग्न, मृत्यू, आजारपण इत्यादीमुळे एक दोन दिवसाची सुट्टी घेतल्यास फार काही बिघडत नाही. पण वारंवार सुट्ट्या घेतल्या किंवा दिर्घ सुट्ट्या घेतल्या तर मालक पैसे कापतात. तसेच दुसरी बाई कामाला ठेऊन घेतात. यामुळे हातचा रोजगार जाण्याची भिती सतत मनात घर करून असते.

**१०. कामाची घाई :-**

सकाळी घरच्या कामाची घाई. कामावर गेल्यावर 8-10 घरातील कामाची घाई. इतक्या घरची कामे ती हळूवार करू शकत नाही. प्रत्येक घरी कामे करतांना वेळेचा विचार करून कामे करते. त्यामुळे घाईघाईने केलेली कामे व्यवस्थित होतील आणि मालकीनीला पसंत पडतील याची हमी देता येत नाही.

**११. मुलांच्या शिक्षणाप्रती उदासिन :-**

आपण कामावर गेल्यावर मुले व्यवस्थित शाळेत जातात की नाही किंवा ते अभ्यास करतात किंवा नाही याची ती फारशी चौकशी करीत नाही. उलट मुलं शिकली किंवा नाही शिकली तर काय फरक पडतो हा विचार करून ती त्याकडे दुर्लक्ष करते. तिच्या उदासिनतेमुळे मुले अनियंत्रीत उनाड आणि व्यसनी बनायला लागतात.

**१२. पैसे मिळण्यात दिरंगाई :-**

तिच्या कामाचा महिना भरल्यानंतर ठरलेले मासिक मानधन प्रत्येक घरी ठराविक तारखेला मिळेलच याची शाश्वती नसते. काही घरचे लोकं महिना भरल्याबरोबर पैसे देतात. तर काही घरचे लोकं उद्या दतो ! परवा देतो !! चे बहाणे करतात. पैसे वेळेवर न मिळाल्यामुळे तिच्या घरी अडचणी वाढतात.

**१३. मालकांकडून असभ्य व्यवहार :-**

ही कामवाली बाई कमी शिकलेली असते. तशिच ती परिस्थितीने गांजलेली असते. त्यामुळे तिची भाषा आणि व्यवहार रांगळे असतात. ती सौजन्यशिल वाटत नाही. ही मोलकरीन आहे. जनु काही ती आपली गुलाम आहे. असा विचार मनात बाळगुन अनेक घरवाल्या महिलांकडून अनेकदा असभ्य भाषेत तिचा पानउतारा होत असतो. त्यामुळे तिच मन दुखावलं जाते. पण तिचा नाईलाज असतो.

**१४. मालकांकडून यौन शोषन :-**

घरामध्ये सुंदर पत्नी असतांना देखिल काही घरातील बाहेरख्याली, आंबटशौकीन पुरुषांची नजर कामवालीवर खिळत असते. पत्नी घरी नसली आणि कामवाली आली तर तिच्यशी सलगी करण्याचा प्रयत्न होतो. तिने विरोध केला तर तिला पैशाचे आमिष दिले जाते. तरिही तिने विरोध केलाच तर कामवरून काढून टाकण्याची, थकित पैसे न देण्याची धमकी देऊन कधी बळजबरीने तर कधी संगनमताने तिचे यौन शोषन करण्यात येते.

**१५. अपेक्षांची अपूर्ती :-**

कामवाली बाई ही मानव आहे. एक मानव म्हणून तिलाही भावभावना आहेत. विचार – विकार आहेत. तिच्याही अपेक्षा आहेत. पण ... पण गरिबी, कुपोषन, जबाबदाऱ्या, कामाची दगदग, मुले इत्यादीमुळे तिच्या अपेक्षा कधीच पूर्ण होत नाहीत. तिला आपल्या अपेक्षांना परिस्थितीपुढे दाबून टाकावे लागते आणि प्राप्त परिस्थितीला स्विकारावे लागते.

वरिलप्रमाणे कामवाल्या बाईचे अनेक प्रश्न आणि समस्या असतात. त्यांचा तिला दैनंदिन जीवनात सामना करावा लागतो.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. *डॉ. बी. एम. कऱ्हाडे, भारतीय समाजः प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे एंड कं. पब्लिकेशन महाल, नागपूर.*
२. *संपादक, प्रदिप गायकवाड कामगार चळवळ आणि डॉ. आंबेडकर समता प्रकाशन, लष्करीबाग, नागपूर*
३. *मिनाक्षी मून, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ समता प्रकाशन, नागपूर.*
४. *डॉ. माधवी कवी, महिला कल्याण आणि विकास. विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती*
५. *डॉ. मधुरा कोरान्ने, स्त्री समस्या आणि आजचे नाटक स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.*